# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

(सायंकाळ)

**दिनांक २४.०६.२०२६ बुधवार**

**(कामगिरी)**

**सिताबर्डी पोलीसांची कामगिरी :— घातक शस्त्र बाळगणाऱ्या ईसमास अटक. वाहन चोरीचे गुन्हे उघडकीस.**

दिनांक २३.०६.२०२६ चे १८.४५ वा. चे सुमारास, सिताबर्डी पोलीसांचे पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना खात्रीशीर माहीती मिळाली की, मोरभवन बस स्टॉप मागील गल्लीमध्ये एक ईसम शस्त्र बाळगुन आहे. अशा सुचनेवरून तेथे गेले असता, मिळालेल्या वर्णनाचा ईसम पोलीसांना पाहुन पळु लागला. त्यास पाठलाग करून ताब्यात घेतले. पंचासमक्ष त्यास त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव ईशु रवि सोनटक्के, वय २१ वर्षे, रा. वसंतराव नाईक झोपडपट्टी, अमरावती रोड, सिताबर्डी, नागपूर असे सांगीतले. त्याची अंगझडती घेतली असता, त्याचे पॅन्टचे आंत कंबरेत एक लोखंडी चाकु मिळुन आला. पोलीस ठाणे येथे आणुन त्याची अधिक सखोल विचारपुस केली असता, त्याने पोलीस ठाणे सिताबर्डी हद्दीत ०२ वाहनचोरीचे गुन्हे केल्याची तसेच पो. ठाणे एमआयडीसी हद्दीत ०१ घरफोडीचा गुन्हा केल्याची कबुली दिली. आरोपीचे ताब्यातुन लोखंडी चाकु व गुन्ह्यात चोरी केलेले वाहने १) स्प्लेंडर प्लस क्र. एम.एच. ३१ एफ.के. ४९४२ २) स्प्लेंडर क्र. एम.एच. ३१ डि.आर. २७२१ ३) होंडा अॅक्टीवा क्र. एम.एच ४० ए.जे. ५०९९ ४) ज्युपीटर मोपेड क्र. एम.एच ४० सि.एल. ५७७३ असे एकुण ०४ दुचाकी वाहने असा एकूण किंमती अंदाजे २,३०,२००/— रू. चा जप्त करण्यात आला.

आरोपी हा दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने चाकु बाळगुन समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे सिताबर्डी येथे आरोपीविरूध्द कलम ४, २५ भा.ह.का., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. रविन्द्रकुमार सिंगल, पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी, सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्रीमती विनीता शाहु, अपर पोलीस आयुक्त (उत्तर प्रभाग) नागपूर शहर, मा. श्रीमती अन्नपुर्णा सिंग, पोलीस उप आयुक्त (परि.क्र. २), मा. श्री. किरण पोपळघट, सहा. पोलीस आयुक्त (सिताबर्डी विभाग) यांचे मार्गदर्शनात, वपोनि. सुहास राऊत, दुपोनि. मनिष कोल्हटकर, पोउपनि. शाम वारंगे, पोहवा. नंदकिशोल वाल्दे, पोअं. शत्रृघ्न मुंढे, प्रशांत भोयर, चेतन शेंडे, नयनिश तलवारे यांनी केली.



## (गुन्हे)

**पोलीस ठाणे कपील नगर :— घरफोडी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक २२.०६.२०२६ चे १२.०० वा. ते २०.३० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे कपीलनगर हद्दीत, स्वप्न निकेतन सोसायटी, विंग ए, पिवळी नदी, कामठी रोड, नागपुर येथे राहणारे फिर्यादी प्रिन्स धनराज पुणेकर, वय २६ वर्षे हे आपले राहते घराला कुलूप लावून ते व त्यांची पत्नी आपले कामावर गेले असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे फ्लॅटचे मुख्य दाराचे कुलूप तोडून आंत प्रवेश करून, आलमारीत ठेवलेले रोख २०,०००/—रू. व सोन्याचे वेगवेगळे दागिने एकुण किंमती अं. १,१७,२४७/—रू. चा मुद्देमाल चोरून नेला.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे कपीलनगर येथे मपोउपनि. शिवाली उलमाले ९२२६००३४४१ यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ),३३१(३) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

## (मिसिंग)

**१) पोलीस ठाणे तहसिल :—** सौ. विना संजय निखारे, वय २४ वर्षे, रा. टिमकी पोलीस चौकीमागे, तहसिल, नागपूर ह्या दिनांक २१.०६.२०२६ चे २१.०० वा. पासुन पोलीस ठाणे तहसिल हद्दीतील राहते घरी कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेल्या. घरी परत आल्या नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आल्या नाही. **वर्णन** रंग— सावळा, चेहरा— गोल, बांधा— सडपातळ, उंची— ५ फुट ५ इंच, केस— काळे लांब, अंगात— आकाशी रंगाचा टॉप व पांढऱ्या रंगाचा लॅगीन तसेच, गुलाबी रंगाची स्लीपर चप्पर घातलेली आहे. भाषा— हिंदी/मराठी बोलतात.

**२) पोलीस ठाणे ईमामवाडा :—** सौ. डॉली नितीन गुजर, वय २३ वर्षे, रा. प्लॉट नं. ११, चंदन नगर, ईमामवाडा, नागपूर ह्या दिनांक १८.०६.२०२६ रोजी पासुन पोलीस ठाणे ईमामवाडा हद्दीतील राहते घरी कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेल्या. घरी परत आल्या नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आल्या नाही. **वर्णन** रंग— सावळा, चेहरा— गोल, बांधा— सडपातळ, उंची— ५ फुट १ इंच, केस— काळे लांब, अंगात— निळ्या रंगाचा सलवार सुट घातलेला आहे. भाषा— हिंदी/मराठी बोलतात.

**३) पोलीस ठाणे कोतवाली :—** महेंद्रकुमार महेश पारधी, वय ३४ वर्षे, रा. मुंजे सभागृह जवळ, नटराज टॉवर समोर, महाल, कोतवाली, नागपूर हे दिनांक १७.०६.२०२६ रोजी पासुन पोलीस ठाणे कोतवाली हद्दीतील राहते घरी कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेले. घरी परत आले नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आले नाही. **वर्णन** रंग— सावळा, चेहरा— गोल, बांधा— मजबुत, उंची— ५ फुट ५ इंच, केस— काळे, अंगात— निळ्या पांढऱ्या रंगाचा शर्ट व आकाशी रंगाचा फुल पॅन्ट घातलेला आहे. भाषा— हिंदी/मराठी बोलतात.

**४) पोलीस ठाणे गिट्टीखदान :—** अमरीश दिलीप शुक्ला, वय ४२ वर्षे, रा. प्लॉट नं. २०३, पेंशन नगर, गिट्टीखदान, नागपूर हे दिनांक ०४.०६.२०२६ चे २१.३० वा. पासुन पोलीस ठाणे गिट्टीखदान हद्दीतील राहते घरी कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेले. घरी परत आले नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आले नाही. **वर्णन** रंग— गोरा, चेहरा— लांबट, बांधा— मध्यम, उंची— ५ फुट ११ इंच, केस— काळे, अंगात— आकाशी रंगाची टि—शर्ट व निळ्या रंगाचा जिन्स पॅन्ट घातलेला आहे. भाषा— हिंदी/मराठी बोलतात. ओळख— उजव्या हातावर इंग्रजीत अमरीश नांव लिहीलेले आहे.

**५) पोलीस ठाणे जरीपटका :–** सौ. मालती प्रदीप लांजेवार, वय ५० वर्षे, रा. नारा घाट जवळ, जरीपटका, नागपूर ह्या दिनांक १२.०६.२०२६ चे १८.३० वा. पासुन पोलीस ठाणे जरीपटका हद्दीतील राहते घरी कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेल्या. घरी परत आल्या नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आल्या नाही. **वर्णन** रंग– गोरा, चेहरा– गोल, बांधा– सडपातळ, उंची– ५ फुट १ इंच, केस– काळे लांब, भाषा– हिंदी/मराठी बोलतात.


सौ. विना


सौ. डॉली


महेंद्रकुमार


अमरीश


सौ. मालती

**(ईतर)**

**आरोपींनी न्यायालयात हजर होणेबाबत :–**

मा. विद्यमान न्यायाधीश यांनी त्यांचे कोर्टातील केस क्र. व कलम मधील खालील नमुद आरोपी/साक्षीदार हे तारखेवर सतत गैरहजर राहत असल्याने त्यांचेविरुध्द जाहीरनामा प्रसिध्द केला आहे. खालील तक्त्यात नमुद आरोपी / साक्षीदार यांनी नमुद तारखेपर्यंत मा. न्यायालयासमोर हजर व्हावे.

| अ | कोर्टाचे नाव | केस क्र. | कलम | आरोपीचे नाव व पत्ता | पेशी तारीख |
|---|---|---|---|---|---|
| १. | मा. प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी साहेब, कोर्ट क्रं. ०८, नागपुर. | पो. ठाणे कोतवाली अप. क्र. ३३२/२०२३ | कलम ४२०, ३४ भा.दं.वि., सहकलम. ६६ (ड) आयटी ॲक्ट. | १) सुजान सुभाष समददार, वय २८ वर्षे, रा. देशबंधु पैले, कुलीहांडा, रबिंद्रनगर, चिन्सुराह, जि. हुगडी (प. बंगाल)<br>२) समीरदास प्रेमचंद दास, वय २८ वर्षे, रा. नंदनकानन, कोडालीया, सिटी बंडेल, चिन्सुराह, जि. हुगडी, (प. बंगाल). | २९.०६.२०२६ |
| २. | मा. प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी साहेब, कोर्ट क्रं. ०८, नागपुर. | पो. ठाणे कोतवाली अप. क्र. ३७३/२०२३ | कलम ४२०, ३४ भा.दं.वि., सहकलम. ६६ (ड) आयटी ॲक्ट. | समीर बगराई मुर्मु, वय २३ वर्षे, रा. अनंतकोर, अपचरा, बेहरमपोर, पो. ठाणे नवाग्राम, जि. मुर्शीदाबाद, (प.बंगाल). | ३०.०६.२०२६ |

**स्वा/–**

**( अंकुश राठोड )**
**पोलीस उपनिरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**